ePaper

## लाडक्या बहिणींसाठी आनंदवार्ता! 1500 नाही 3000 रुपये खात्यात येणार?

| वर्ष - 9 | अंक -103 | UDYAM-MH-26-0158827 |




महाईन्यूज ™

### आतील पानांत


- विमान उड्डाणे रद्दचा BCCI ला फटका!
- हा तर रोनाल्डोच खेळताना दिसतोय!
- प्रियंकाचा केंद्र सरकारवर हल्लाबोल
- सीमा हैदर पुन्हा गर्भवती


www.mahaenews.com | शनिवार, दि. ६ डिसेंबर २०२५ | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**महायुती सरकारची वर्षपूर्ती** फडणवीस 'रबर स्टॅम्प', खरे मुख्यमंत्री अमित शाहच!

# 'महाराष्ट्र दिल्लीत गहाण'!

## हर्षवर्धन सपकाळ यांची सत्ताधाऱ्यांवर घणाघाती टीका

| नागपूर | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**महायुती सरकारच्या एका वर्षाच्या कामगिरीवर काँग्रेसने आज जोरदार हल्लाबोल केला. सरकारने दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात अपयश आले असून विकासाऐवजी राज्यात अराजकता, द्वेष, कायदा व सुव्यवस्थेचा अमल निष्प्रभ झालेला दिसतो, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले. "हे वर्ष महाराष्ट्रासाठी दुर्दैवाने लक्षात राहील," असा घणाघाती दावा त्यांनी आज पत्रकार परिषदेत केला.**



- राज्यात अराजकता, जातीसंघर्ष, गुन्हेगारी वाढली
- महायुतीच्या एका वर्षावर काँग्रेसचा हल्लाबोल – 'महाराष्ट्र दिल्लीत गहाण'
- फडणवीस केवळ 'रबर स्टॅम्प', खरे मुख्यमंत्री अमित शाह : सपकाळ
- राज्यात वाढली गुन्हेगारी संस्कृती – 'खोके, कोयता, माफिया' शब्द बहाल
- गृहराज्यमंत्र्यांच्या वक्तव्यावर संताप – 'हे महाराष्ट्रासाठी लज्जास्पद'
- विधानसभेत चर्चेऐवजी 'रमी' – सरकारला 'लाचार, बेशरम' ठरवले
- जातीय संघर्ष, हत्याकांड वाढले – इतिहासातील सर्वात अपयशी सरकार

सपकाळ म्हणाले, "सत्तेच्या मोहात महाराष्ट्राचा स्वाभिमान दिल्लीच्या राजवटीकडे गहाण ठेवला गेला. निवडणुकीच्या काळात दिलेल्या मोठमोठ्या आश्वासनांपैकी एकाही आश्वासनाची पूर्तता आजवर झालेली नाही. २०१४ ते २०१९ दरम्यानचे देवेंद्र फडणवीस आणि आजचे मुख्यमंत्र्यांचे रूप यात जमीन-आस्मानाचा फरक पडला आहे." त्यांनी पुढे आरोप केला की, सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे केवळ नावापुरते मुख्यमंत्री असून महाराष्ट्राचे प्रत्यक्ष निर्णय केंद्रीय गृहमंत्री अमित शाह घेत आहेत. "फडणवीस हे 'रबर स्टॅम्प' मुख्यमंत्री झाले आहेत," असा टोला सपकाळ यांनी लगावला.

### 'गलथान कारभार आणि वाढती गुन्हेगारी'

राज्य सरकारची कार्यपद्धती पूर्णपणे संदिग्ध, संभ्रमित आणि गलथान असल्याचा आरोप करीत काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी अनेक उदाहरणांचा हवाला दिला. नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाचा निर्णय वर्षभर प्रलंबित असणे ही सरकारच्या असमर्थतेची पावती असल्याचे ते म्हणाले.

सपकाळ म्हणाले, "राज्यात 'आका' संस्कृती, 'खोके' संस्कृती, 'कोयता गँग', 'रेती माफिया' अशी नवे निर्माण करणारी शब्दावली सरकारने राज्याला बहाल केली. हे स्वतःच राज्यातील गुन्हेगारी वृत्तीला खतपाणी घालणारे आहे."

### पुणे बलात्कार प्रकरण आणि

## राजकीय संघर्षाला नवी ठिणगी

महायुती सरकारच्या एका वर्षानिमित्त काँग्रेसने केलेली ही सबळ आणि आक्रमक टीका राज्यातील राजकीय संघर्षाला नवी ठिणगी देणारी ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. आगामी नगरपालिकांच्या निवडणुका, तसेच विधानसभेच्या यंदाच्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर या टीकेचा सरकारला प्रतिवाद करावा लागणार हे निश्चित.

### असंवेदनशील वक्तव्य

पुण्यातील बलात्कार प्रकरणात पीडितेवर उलट जबाब टाकणारे गृहराज्यमंत्र्यांचे वक्तव्य सपकाळ यांनी अत्यंत असंवेदनशील ठरवले. "पीडित महिला ओरडली असती तर बलात्कार झाला नसता," असे विधान महाराष्ट्रातील गृहकारभार पाहणाऱ्या मंत्र्याकडून होते, ही महाराष्ट्रासाठी लज्जास्पद बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या कुटुंबाशी संबंधित डान्स बार प्रकरण उघडकीस आले असून सरकारची नैतिकता पूर्णतः खालावलेली असल्याचेही सपकाळ म्हणाले.

### विधानसभेत चर्चा नाही, 'रमी' खेळ

राज्यातील संसदीय परंपरा, विधिमंडळातील चर्चा संस्कृती आणि राजधर्म यांची पायमल्ली झाल्याचा आरोप करताना सपकाळ यांनी सांगितले, "विधानसभेत महत्त्वाच्या चर्चेऐवजी 'रमी खेळली जाते', चर्चा सुरू असताना गोंधळ, गुंडागर्दी होते. हे सरकार सत्तेसाठी एकत्र आलेलं आहे; पुरोगामी विचार, महाराष्ट्र धर्म जपण्याची त्यांच्या मनात अक्षरशः तमा नाही."

त्यांनी सरकारला "लाचार, अधर्मी, टोळी युद्धाचे आणि बेशरम सरकार" अशी कठोर विशेषणे लावली.

### हत्या, हल्ले आणि जातीसंघर्ष वाढला

हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्यातील कायदा-सुव्यवस्थेचे चित्र अधिक गंभीर असल्याचे म्हटले. "या वर्षात संतोष देशमुख आणि संपदा मुंडे यांसारखी धक्कादायक हत्याकांडं घडली. जातीनिहाय आंदोलने, आरक्षण संघर्ष उग्र झाला. बौद्धिक व मानसिक दिवाळखोरी राज्यात पसरत आहे. हे सर्व पाहता, महाराष्ट्राच्या इतिहासातील हे सर्वात कमकुवत आणि लाचार सरकार ठरते," असा दावा त्यांनी केला.

राज्याची अर्थव्यवस्था कोलमडलेली असून केवळ पंतप्रधानांचे नामजप करण्याऐवजी विशेष आर्थिक पॅकेज आणावे, अशी मागणीही त्यांनी केली.

### औरंगजेब आणि गोडसेशी तुलना

शुभेच्छा देतानासुद्धा सपकाळ यांनी सरकारवर टीकेची झोड उठवण्यास चुकवले नाही. या एका वर्षात क्रूर आणि महाराष्ट्रविरोधी कारभार केल्यामुळे त्यांची तुलना औरंगजेबाशी करावी लागली," असा धक्कादायक आरोप त्यांनी केला.

याहून पुढे जात सपकाळ म्हणाले, "ज्या पद्धतीने थंड डोक्याने नथुराम गोडसेने महात्मा गांधींची हत्या केली, तीच मोडस ऑपरेंटिस देवेंद्र फडणवीस यांची आहे.

## रखडलेले प्रकल्प ठरतायत कारण

## रस्त्यावरील वाहनभार सातत्याने वाढत चालला

# रावेत-बाणेर मार्गावर भीषण कोंडी

## एलिव्हेटेड कॉरिडॉरची योजना कागदावरच



।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**मुंबई-बंगळुरू महामार्गावरील रावेत ते बाणेरदरम्यान गुरुवारी सकाळच्या गर्दीत वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण झाली. विशेषत: वाकड परिसराजवळील भूमकर चौक, भुजबळ चौक आणि मुळा नदीवरील पुलाकडे जाताना वाहनांचे अक्षरशः सर्पिल अशा रांगा लागल्या होत्या. अनेक वाहनचालक सकाळीच या कोंडीत अडकले आणि पुढे जाण्यासाठी त्यांना थांबणे, सिग्नल अडथळे आणि धीम्या गतीने सरकणाऱ्या ताफ्यातून वाट काढावी लागली. काही ठिकाणी तर दोन-तीन वाहने सरकण्यासाठी पाच-दहा मिनिटांचा अवधी लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले.**

कोंडीचे प्रमाण वाढण्यामागे स्थानिकांनी काही ठोस कारणेही अधोरेखित केली आहेत. रखडलेले रस्ता रुंदीकरण, अरुंद मुळा नदीवरील पूल, दोन्ही चौकांमधील वाढलेली वाहतूक, त्यातच सेवा रस्त्यांवरील अतिक्रमण यामुळे मुख्य वाहतूक प्रवाह स्वतःच गुदमरल्यासारखा वाटत असल्याचे नागरिकांचे मत आहे. विशेषत: भुजबळ चौक हा हिंजवडी आयटी पार्क, औद्योगिक पट्टा आणि पुणे-मुंबई महामार्ग यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात वाहने या मार्गावरून धावतात. वाढत्या आयटी कंपन्या, निवासी प्रकल्प आणि व्यावसायिक आस्थापनांमुळे गेल्या काही वर्षांत या रस्त्यावरील वाहनभार सातत्याने वाढत चालला आहे.रावेत ते नऱ्हेदरम्यान सहापदरी २४ किमी एलिव्हेटेड कॉरिडॉर उभारण्याची योजना अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, या प्रकल्पामुळे कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल, अशी अपेक्षा आहे. मात्र, प्रत्यक्ष कामाला अजूनही सुरुवात झालेली नाही. रावेत-वाकडदरम्यान सेवा रस्त्यांचे रुंदीकरण व काँक्रीटीकरण करण्याचा प्रस्ताव असला तरी भूसंपादनाचा प्रश्न न सुटल्याने हे काम थांबलेल्या अवस्थेत आहे. महामार्ग प्राधिकरण आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांच्यातील समन्वयाच्या उशिरीचा फटका नागरिकांना बसत असल्याची भावना व्यक्त होत आहे.बाणेर-रावेत मार्गावरील भुयारी मार्गाचा विस्तार आणि रस्ता रुंदीकरणाचा विलंब हा या संपूर्ण परिसरातील कोंडीचा मुख्य मुद्दा आहे. भूसंपादन प्रक्रियेला गती देऊन रुंदीकरणाचे काम तातडीने पूर्ण झाले, तर कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. वाहतूक नियोजन सुधारून अडथळे दूर केल्याशिवाय येथील परिस्थिती बदलणार नसल्याचे स्पष्ट दिसत आहे.कोंडी वाढवणारे अडथळ्यामध्ये काही कारणे समोर आली आहेत. यामध्ये भुयारी मार्गालगत उभी असलेली अनधिकृत दुकाने, अनधिकृत रिक्षा थांबे, रस्त्यावर बेशिस्तपणे उभ्या केल्या जाणाऱ्या गाड्या, अवैध खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्यांचा त्रास आणि रस्त्यालगत फळ विक्रेते आणि त्यांची वाहने यामुळे नाहक वाहतूक कोंडीमध्ये भर पडत आहे. याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सहशहर अभियंता बापू गायकवाड यांनी मत मांडले. ते म्हणाले की,“महापालिका हद्दीतील बहुतांश काम आम्ही पूर्ण केले आहे. मात्र महामार्गालगत असलेल्या सेवा रस्त्यांचे रुंदीकरण भूसंपादन न झाल्याने प्रलंबित आहे. ज्या ठिकाणी भूसंपादन पूर्ण झाले, तेथे लवकरात लवकर काम सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.”मुंबई-बंगळुरू महामार्गावरील रावेत ते बाणेरदरम्यान गुरुवारी सकाळच्या गर्दीत वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण झाली. विशेषत: वाकड परिसराजवळील भूमकर चौक, भुजबळ चौक आणि मुळा नदीवरील पुलाकडे जाताना वाहनांचे अक्षरशः सर्पिल अशा रांगा लागल्या होत्या. अनेक वाहनचालक सकाळीच या कोंडीत अडकले आणि पुढे जाण्यासाठी त्यांना थांबणे, सिग्नल अडथळे आणि धीम्या गतीने सरकणाऱ्या ताफ्यातून वाट काढावी लागली. काही ठिकाणी तर दोन-तीन वाहने सरकण्यासाठी पाच-दहा मिनिटांचा अवधी लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले. चौकांमधील वाढलेली वाहतूक, त्यातच सेवा रस्त्यांवरील अतिक्रमण यामुळे मुख्य वाहतूक प्रवाह स्वतःच गुदमरल्यासारखा वाटत असल्याचे नागरिकांचे मत आहे.

### रुंदीकरणाच्या विलंबाने समस्या

वाढत्या आयटी कंपन्या, निवासी प्रकल्प आणि व्यावसायिक आस्थापनांमुळे गेल्या काही वर्षांत या रस्त्यावरील वाहनभार सातत्याने वाढत चालला आहे.रावेत ते नऱ्हेदरम्यान सहापदरी २४ किमी एलिव्हेटेड कॉरिडॉर उभारण्याची योजना अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, या प्रकल्पामुळे कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल, अशी अपेक्षा आहे. मात्र, प्रत्यक्ष कामाला अजूनही सुरुवात झालेली नाही.

# शिक्षक मतदारसंघांच्या याद्या प्रसिद्ध

## पुणे विभागातील 2.72 लाख पदवीधर, 44 हजार शिक्षक नोंदणी




।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पुणे विभागातील पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या नव्याने मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमांतर्गत प्रसिद्ध केलेल्या प्रारुप मतदार यादीनुसार पुणे विभागात २ लाख ७२ हजार ६१ पदवीधरांची तर ४४ हजार २३३ शिक्षक मतदारांची नोंदणी झाली आहे.**

या २०२५ च्या कार्यक्रमांतर्गत प्रारुप मतदार यादीनुसार पदवीधर मतदार संघासाठी पुणे जिल्ह्यात ५४ हजार ८१० मतदार नोंदणी, सातारा-३५ हजार ८७९, सोलापूर ३० हजार ४७२, कोल्हापूर- ८० हजार १८०, सांगली-७० हजार ७२० अशी एकूण २ लाख ७२ हजार ६१ इतकी नोंदणी झाली आहे. तर शिक्षक मतदार संघासाठी पुणे-९ हजार ७७८, सातारा ८ हजार ४९२, सोलापूर- ११ हजार १९८, कोल्हापूर ८ हजार ६३१ व सांगली- ६ हजार १३४ अशी एकूण ४४ हजार २३३ मतदार२०२० मध्ये पदवीधर मतदार संघासाठी ४ लाख २० हजार ८९६ इतकी तर शिक्षक मतदारांची ७२ हजार १९० इतकी नोंदणी होती. गेल्या निवडणुकीपेक्षा यावर्षी आतापर्यंत कमी मतदार नोंदणी झाली आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी मतदार नोंदणीची जागृती करुन पात्र मतदारांना नोंदणीसाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त तथा पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले आहे. रांची नोंदणी झाली आहे. दावे व हरकतींचा कालावधी संपल्यानंतर ५ जानेवारी २०२६ रोजी दावे व हरकती निकाली काढून पुरवणी यादी तयार करणे व छपाईची कार्यवाही करण्यात येईल. प्रसिद्धी १२ जानेवारी २०२६ रोजी केली जाणार आहे.

### नमुना ८ दाखल करता येईल

या कार्यक्रमांतर्गत १८ डिसेंबर २०२५ पर्यंत मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या पदनिर्देशित अधिकारी किंवा संबंधित विधानसभा मतदार संघाचे सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे दावे व हरकती दाखल करता येतील. नवीन नाव नोंदणीचा दावा दाखल करण्यासाठी पदवीधरांना नमुना क्रमांक १८ व शिक्षकांना नमुना क्रमांक १९ द्वारे याच कालावधीत दावा दाखल करता येईल, प्रारुप मतदार यादीतील नावांबाबत आक्षेप असल्यास नमुना क्रमांक ७ व यादीतील नोंदीमध्ये दुरुस्तीसाठी नमुना क्रमांक ८ दाखल करता येईल,

आकाशचिन्ह व परवाना विभागाची कारवाई

वर्षभरात तब्बल १ लाख ७७ हजार २६६

# फ्लेक्स, बॅनर, किऑस्कवर कारवाईचा दंडुका

## शहरात १७ गुन्हे दाखलः २३ लाखांचा दंड वसूल

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरात अनधिकृतपणे होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर, किऑस्क लावून विद्रुपीकरण करणाऱ्यांवर आकाशचिन्ह व परवाना विभागाने कारवाईचा दंडुका उगारला आहे. वर्षभरात तब्बल १ लाख ७७ हजार २६६ अनधिकृत होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर, किऑस्कवर कारवाई केली आहे. १११ नागरिक आणि व्यावसायिकांकडून २३ लाख १९ हजार दंड वसूल केला आहे. त्याचबरोबर १७ गुन्हे दाखल केले आहेत.**



पिंपरी-चिंचवड शहरात १ हजार ६७९ अधिकृत होर्डिंग आहेत. शहरातील सार्वजनिक ठिकाणी लग्न, वाढदिवस, स्वागत, निवडणूक, धार्मिक व अन्य कार्यक्रमांचे फ्लेक्स व फलक लावले जातात. यामुळे शहर विद्रूप होत असून वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे अशा प्रकारच्या फ्लेक्स, डग्ज, किऑस्क व फलकांवर आठही क्षेत्रीय कार्यालयांच्या पथकांकडून कारवाई केली जात आहे. त्याबाबत सर्व राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी व शहराध्यक्षांनाही सूचित करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतरही शहरातील विविध भागांत अनधिकृत जाहिराती लावल्या जात आहेत. आगामी काळात महापालिकेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे सद्यःस्थितीत सर्वच राजकीय पक्षांचे इच्छुक विविध कार्यक्रम घेत असून, अनधिकृतपणे जाहिरात करत आहेत. त्यामुळे महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. आकाशचिन्ह व परवाना विभागाने १४ ऑक्टोबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत ८ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत अतिक्रमण पथकाने विशेष मोहीम राबविली. त्याअंतर्गत १ लाख ७७ हजार २६६ अनधिकृत डग, पोस्टर्स, बॅनर्स, फ्लेक्स, किऑ क्सवर कारवाई केली आहे. शहर विद्रूप करणाऱ्या १११ व्यावसायिक, नागरिकांकडून २३ लाख १९ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

यापुढेही अनधिकृतपणे जाहिराती करणाऱ्यांवर दंडात्मक, फौजदारी कारवाई केली जाणार असल्याचा असा इशारामहापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त राजेश आगळे यांनी दिला आहे.

> “ तबल १ लाख ७७ हजार २६६ अनधिकृत होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर, किऑस्कवर कारवाई केली आहे. १११ नागरिक आणि व्यावसायिकांकडून २३ लाख १९ हजार दंड वसूल केला आहे. १७ गुन्हे दाखल केले आहेत. सर्व नागरिक, संस्था, व्यापारी, उद्योजक व राजकीय पक्षांना शहरातील कोणत्याही भागात अनधिकृत होर्डिंग, फलक, पोस्टर्स, बॅनर, फ्लेक्स किंवा किऑस्क लावू नयेत
>
> **-राजेश आगळे,** उपायुक्त, आकाशचिन्ह व परवाना

### अधिकृत जाहिरात फलकांना क्यूआर कोड बंधनकारक

शहरातील विविध भागांतील परवाना निरीक्षकांनी जाहिरात फलकांची पाहणी केली. मात्र, अनेक हो फिलकांच्या खाली क्यूआर कोड, फलकाची माहिती असलेली पाटी नसल्याचे दिसून येत आहे. उच्च न्यायालयाने फलकांच्या खाली क्यूआर कोड, माहिती पाटी लावणे बंधनकारक केला आहे. त्यामुळे ज्या फलकांच्या खाली क्यूआर कोड, फलकाची माहिती नसेल अशा फलकांना अनधिकृत ठरवून परवाने रद्द करावेत, असे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे जाहिरातदारांनी फलकांच्या खाली दर्शनीय भागावर क्यूआर कोड, जाहिरातधारकांच्या नामफलकाची माहिती दर्शविणाऱ्या पाट्या त्वरित बसवाव्यात. ज्या फलकांच्या खाली नामफलकाची पाटी दिसून येणार नाही, असे सर्व जाहिरात फलक अनधिकृत समजून परवाने रद्द करण्यात येतील, असा इशारा आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त राजेश आगळे यांनी दिला आहे.

# ‘रेपो’ दरकपातीने गृहनिर्माण क्षेत्राला चालना!

## गृहखरेदीदारांना मोठा दिलासा : मनिष जैन; RBI च्या 1.25% एकूण दरकपातीमुळे EMI कमी

। पुणे । । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) रेपो दरात २५ बेसिस पॉइंट्सची कपात जाहीर करत चालू आर्थिक वर्षात एकूण १२५ बेसिस पॉइंट्सची दरकपात लागू केल्यानंतर रिअल इस्टेट क्षेत्रातून सकारात्मक प्रतिक्रिया उमटत आहेत. क्रेडाई पुणेचे अध्यक्ष श्री. मनिष जैन यांनी या निर्णयाचे स्वागत करत यामुळे अर्थव्यवस्थेला तसेच गृहनिर्माण क्षेत्राला व्यापक दिलासा मिळणार असल्याचे मत व्यक्त केले.**




श्री. जैन म्हणाले की, “रेपो दरातील एकूण १.२५% कपातीमुळे कर्ज घेण्याचा खर्च लक्षणीयरीत्या कमी होईल, तरलता वाढेल आणि व्यवसायांची गती सुधारेल. हे पाऊल अर्थव्यवस्थेला अधिक वेग देणारे आहे.”

गृहखरेदीदारांसाठी या निर्णयाचे परिणाम त्वरित जाणवतील, असे त्यांनी स्पष्ट केले. उदाहरण देताना ते म्हणाले की, ७५ लाख रुपयांच्या २० वर्षांच्या गृहकर्जावर मासिक हप्त्यात अंदाजे ६,००० रुपयांनी घट होऊ शकते.

कर्जाच्या संपूर्ण कालावधीत यामुळे सुमारे १५ लाख रुपयांची बचत होण्याची शक्यता असून, त्यामुळे घर खरेदीची क्षमता आणि ग्राहकांचा आत्मविश्वास दोन्ही वाढेल.

यामुळे गृहनिर्माण क्षेत्रातील मागणीत महत्त्वपूर्ण वाढ होण्याची शक्यता व्यक्त करत श्री. जैन यांनी बँकांना ग्राहकांच्या हितासाठी तातडीने पावले उचलण्याचे आवाहन केले.

“रिझर्व्ह बँकेच्या दरकपातीचा लाभ बँकांनी विलंब न लावता कर्जदारांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे,” असे ते म्हणाले.

कर्जदरांमध्ये त्वरित घट परावर्तित झाल्यास गृहखरेदीदारांसाठी घर घेणे अधिक परवडणारे व सुलभ होईल, असेही त्यांनी नमूद केले.

> “ “रिझर्व्ह बँकेच्या दरकपातीने गृहखरेदीदारांसाठी नवे दार उघडले आहे. EMI मधील घट केवळ आर्थिक दिलासा नाही, तर स्वतःच्या घराच्या स्वप्नाला गती देणारी संधी आहे. आता बँकांनी हा फायदा तातडीने ग्राहकांपर्यंत पोहोचवणे हीच काळाची गरज आहे.”




## भूमिका

**विशाल, खंडप्राय देशात ब्रिटिश विद्वान सत्ताधीश साशंक होते आणि हाच मुद्दा रेटत भारताला सध्या स्वातंत्र्य देणे कसे चुकीचे होईल, असे सांगत होते. त्यामध्ये काही अंशी तथ्य आहे, असा समज होण्याचे कारण म्हणजे भारताची तत्कालीन समाजव्यवस्था. त्यावेळी देशात मोठ्या प्रमाणात अशिक्षित वर्ग होता. ब्रिटिश राजवटीने केलेल्या लुटीमुळे आलेले दारिद्र्य, यामुळे देशाची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती सबल नव्हती.**

# संविधानाची अमृतमहोत्सवी फलश्रुती

देशातील समाजधुरिणांनी स्वातंत्र्याच्या पेटवलेल्या मशालीचा भडका उडून स्वातंत्र्याप्रति भारतीय मानसिकता अधिक आक्रमक झाली.

ब्रिटिशांना काहीशा नाइलाजाने का होईना भारताला स्वातंत्र्य देणे भाग पडले. आता अशा सामाजिक परिस्थितीमध्ये देशाचा गाडा हाकण्यासाठी येथील समाजाला पचेल, रुचेल असे संविधान तयार करणे याचे मोठे आव्हान होते आणि त्यामधूनच राज्यघटनेची उभारणी झाली. संविधानाची उभारणी करताना देशाच्या विविध प्रांतांतून सामाजिक, राजकीय आणि कायद्याची जाण असणाऱ्या २८४ सदस्यांची नियुक्ती संविधान सभेसाठी केली होती. संविधान तयार व्हायला दोन वर्षे, ११ महिने आणि १८ दिवस एवढा प्रदीर्घ काळ लागला. हे करत असताना घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील अनेक प्रगत राष्ट्रांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून




त्यातील महत्त्वाच्या तत्त्वांचा समावेश आपल्या संविधानात केला. राज्यघटनेचा सरनामा हा संपूर्ण संविधानाचा आत्मा आहे, असे डॉ. आंबेडकरांनी सांगितले आहे.

जगातली सर्वात मोठी लिखित राज्यघटना आपली आहे. संविधान अंशतः लवचिक व अंशतः ताठर स्वरूपाचे आहे. गेल्या ७५ वर्षात तब्बल १०५ वेळा संविधानामध्ये बदल केले गेले.

संविधानाचे मुख्य भाग असलेले विधिमंडळ, न्यायपालिका आणि कार्यकारी संस्था यांच्या परस्परसंबंधांचा अतिशय चपखल वापर घटनाकर्त्यांनी संविधानाची बांधणी करताना केल्याचे दिसते. त्यामुळे संविधानाच्या तत्त्वानुसारच देशाचा कारभार चालेल, त्यामध्ये राज्यकर्त्यांची किंवा प्रशासकीय कारभाराचे किंवा न्यायपालिकेचा वरचष्मा होणार नाही आणि त्यामुळे सामान्य जनतेच्या हितास बाधा पोहोचणार नाही, याची तजवीज संविधानात केल्याचेही दिसून येते. केशवानंद भारती, गोलकनाथ, मिनर्वा यासारख्या घटनात्मक पेचप्रसंग उद्भवलेल्या खटल्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने न्यायपालिकेचे महत्त्व अधोरेखित करून राज्यकर्ते, प्रशासन आणि न्यायपालिका यांचा घटनेला अभिप्रेत असलेला समतोल सांभाळलेला आहे, संसदेला किंवा राज्यकर्त्यांना राज्यघटनेच्या मूळ ढाच्या किंवा घटनाकारांना अपेक्षित असलेले राज्यघटनेमागच्या तत्त्वास छेद जाईल अशाप्रकारची कोणतीही कृती करता येणार नाही, असा इशाराच न्यायपालिकेने अशा काही प्रकरणांमध्ये दिला असून, ते एका समृद्ध लोकशाही राष्ट्राचे प्रतीक असल्याचे त्यावरून स्पष्ट होते.

न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही चतुःसूत्री म्हणजे संविधानाच्या सरनाम्याचे चार मुख्य आधारस्तंभआहेत. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही गुणत्रयी फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिली असली, तरी ही उच्च जीवनमूल्ये भारतात प्राचीन काळापासून प्रचलित असल्याचे दिसते. गौतम बुद्धांनी दिलेल्या पंचशील तत्त्वामध्ये या गुणत्रयीचे गमक लपलेले आहे. छत्रपती शिवाजीराजे ते राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यकाळात, स्वराज्यात, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या उच्च जीवनमूल्यांना राजाश्रय होता आणि सर्वसामान्य जनता राजाच्या कारभारावर खूश होती. प्राचीन काळातील अनेक संस्थांनात मंत्रिमंडळाची संकल्पना अस्तित्वात होती. अकबर बादशहाच्या राजदरबारात तज्ज्ञ मंत्र्यांच्या सल्ल्याने कारभार चालत असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील अष्टप्रधान मंडळाचा कारभार प्रसिद्ध आहे.

राजेशाहीत राजाला मार्गदर्शन करण्यासाठी मंत्रिमंडळाची व्यवस्था असायची, यावरून भारतामध्ये लोकशाही मूल्ये प्राचीन काळापासून प्रचलित असल्याचे निदर्शनास येते. संविधानाने भारतीय गणतंत्राला सार्वभौमत्व बहाल केले आहे. त्यामुळे भारतीय नागरिक हा स्वतंत्र आणि अधिकार संपन्न झाला आहे. हे अधिकार देताना मूलभूत अधिकारांची योजनादेखील केल्याने भारतीय नागरिकाला सर्वाथिने वैयक्तिक स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. त्याचबरोबर राज्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे विहित करून राज्यकर्त्यांची जनतेप्रति कर्तव्ये अधोरेखित केली आहेत.

## प्रासंगिक »

### रुपया आणि डॉलर !

***डिसेंबरमध्ये अमेरिकन 'फेडरल रिझर्व्ह'कडून व्याजदरात कपात होण्याची शक्यता.***

डॉलर हे जगाचे चलन आहे. त्याला पर्याय शोधण्याचा प्रयत्न झाला; परंतु ऐक्याअभावी तो यशस्वी झाला नाही. आता काही देशांशी डॉलरऐवजी त्यांच्या त्यांच्या चलनात व्यवहार करण्याचे पर्याय पुढे येत असले, तरी अजूनही जागतिक बाजारात डॉलर हेच विनिमयाचे एकमेव साधन आहे. भारत, रशिया, चीन, ब्राझील या देशांनी डॉलरला पर्यायी चलन आणण्याचा नुसता विचार केला, तरी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी किती थयथयाट केला, हे जगाने पाहिले आहे. कधी कधी देशाच्या भल्यासाठी चलनाचे मूल्य घटवावे लागते. चीनने तसे केले. परंतु त्या वेळी काहीच आडपडदा ठेवलेला नव्हता. आता मात्र परिस्थिती मान्य न करता लोकांची दिशाभूल केली जाते. रुपया घसरल्याचे काही वाईट परिणाम असले, तरी काही चांगले परिणामही असतात. त्यात फायदा किती आणि तोटा किती तसेच सामान्यांच्या खिशावर किती बोजा पडणार हे स्पष्ट व्हायला हवे.

मी कोण आहे? या प्रश्नाला 'मी डॉक्टर आहे', 'मी इंजिनिअर आहे', 'मी पट्टेवाला आहे', 'मी पंतप्रधान आहे' अशी अनेक उत्तरे आपणाला ताबडतोब मिळतात. 'मी पुरुष आहे', 'मी स्त्री आहे' असे सहसा कुणी सांगत नाही. त्याच्याही पलीकडे जाऊन 'मी एक सज्जन मनुष्य आहे', 'मी एक चोर आहे', 'मी एक पापी आत्मा आहे.

# व्यवसाय आणि आरोग्य

हा माझा मुलगा, ही माझी पत्नी असे नातेसंबंध सांगताना बंद घराच्या आत आमचा नातेसंबंध कसा आहे किंवा दोघांमध्ये किती प्रेम आहे हेही कुणी सांगत नाही. एकूणच जीवन फार उथळ होत असल्याने त्याच्या खळखळाटपणाचाच अधिक बोलबाला होतो. मनुष्याचा खरा मित्र व आपला अत्यंत खरा प्रियतम जोडीदार म्हणजे आपला 'स्व' खोलवर आत असतो, परंतु त्याची ओळख आपण लक्षातच घेत नाही. आपण त्याला फक्त त्याचे बाह्यस्वरूप व बाह्यजोडीदार म्हणजे त्याचा व्यवसाय यामुळेच ओळखतो. बऱ्याच वेळा व्यवसायाला तरुण सवतीची उपमा दिली जाते. त्याचे एक कारण म्हणजे मनुष्य व्यवसायामागे सतत पळत राहतो व त्यातच पुरुषार्थ मानतो आणि दुसरे कारण म्हणजे व्यवसायसुद्धा एकूण वैयक्तिक जीवनात मानसिक ताणच वाढवतो. + प्रत्येक व्यवसायाचा एक विशिष्ट स्वभाव असतो आणि त्याप्रमाणे मानसिक ताण व त्याचे प्रकारही नक्की होतात. प्रकृती कुठल्याही प्रकारची



असली तरी काही प्रमाणात असंतुलन होतेच. मुळात व्यवसायाला अनुरूप प्रकृती नसल्यास उत्पन्न होणाऱ्या रोगांचा काही ताळबंध राहात नाही. माणसाने करिअर निवडताना आपल्या प्रकृतीचा विचार न करता फक्त आवक व उत्पन्नाचा व नफ्या-तोट्याचा म्हणजेच फक्त पैशाचाच विचार केला की कसलेच भान राहू शकत नाही. सध्याच्या काळात तर हे प्रकर्षाने दिसून येत आहे. रुग्णालयासारखी सेवाक्षेत्रेही केवळ पैशाच्या आणि अधिक नफा मिळवण्याच्या कल्पनेने चालवली जातात किंवा तथाकथित साधुसंत जेव्हा 'दुरितांचे तिमीर जावो' ही कल्पना सोडून केवळ त्यांचे कार्यक्षेत्र पैशासाठी चालवतात, तेव्हा स्वतःची प्रकृती काय, कुठला व्यवसाय आपल्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक प्रकृतीला झेपेल असा सर्व विचार करणार कोण? तरुण मुले करिअर ठरवतात तेव्हा पालक पण केवळ आयुष्य जणू काही पैशांमुळेच सुखी होईल या कल्पनेने मुलांवर त्यांच्या शारीरिक व बौद्धिक कुवतीचा विचार न करता अधिक पैसा मिळवून देणारे अभ्यासक्रम लादतात. संत तुकाराम महाराजांची प्रकृती अत्यंत संतुलित परंतु तरीही कफ-पित्ताची व स्वभाव सात्त्विक व संतपद भूषवणारा, त्यांनी सुरू केलेल्या दुकानाचे म्हणजेच उपजीविकेसाठी पैसे मिळवण्याच्या तंत्राचे जरी तितकेसे जमले नाही तरी शांतता, समाधान व शेवटच्या क्षणापर्यंत वर्धमान पद्धतीने झालेला आयुष्यक्रम आणि त्यातून 'आम्ही जातो अमुच्या गावा, अमुचा राम राम घ्यावा' असा सर्वांना आनंदाने निरोप देत संपवलेली कर्मयात्रा आपल्याला बरेच काही सांगून जाते. घरात दोन मुले असली तर एकाचा पाय घरात टिकत नाही व दुसरा जागेवरून हालत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## कृषी क्षेत्रात डंका! ४५,९११ सौर पंप लावून 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'नोंद

# सरकारची ऐतिहासिक कामगिरी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यामध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारला एक वर्ष पूर्ण झाले आहे. यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगर येथे जनतेला संबोधित करताना सांगितले की, जनतेच्या विश्वासाने महाराष्ट्र वेगाने प्रगती करत आहे.**

### सौर पंप बसवण्यात गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड



### फडणवीस यांनी व्यक्त केला आनंद

केवळ एका महिन्यात ४५,९११ सौर पंप लावून महाराष्ट्राने 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' (GUINNESS WORLD RECORD) मध्ये आपले नाव नोंदवले आहे." विरोधकांच्या टीकेला न जुमानता ही मोठी उपलब्धी साध्य झाली, असे ते म्हणाले. फडणवीस यांनी या कार्यक्रमात उपस्थित असलेल्या गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या अधिकाऱ्यांचेही आभार मानले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, २०१४ मध्ये जेव्हा ते पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले, तेव्हा शेतकऱ्यांची सर्वात मोठी मागणी पाणी आणि बियाण्यांची उपलब्धता होती. विशेषतः मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या समस्या लक्षात घेऊन १ लाख सौर पंप योजना सुरू करण्यात आली होती. मध्ये काही काळ ही योजना थांबली, परंतु २०२२ मध्ये महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर केंद्र सरकारच्या सहकार्याने कुसुम (KUSUM) योजनेअंतर्गत या योजनेला पुन्हा गती देण्यात आली. महावितरणच्या कामामुळे आज देशभरात जेवढे सौर पंप लावले गेले, त्यापैकी ६५ टक्के सौर पंप एकट्या महाराष्ट्रात लावण्यात आले आहेत. याच कारणामुळे महाराष्ट्र या क्षेत्रात देशात नंबर १ स्थानावर पोहोचला आहे.मुख्यमंत्री फडणवीस यांनी अत्यंत महत्त्वाची घोषणा करताना सांगितले की, "केवळ एका महिन्यात ४५,९११ सौर पंप लावून महाराष्ट्राने 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' (GUINNESS WORLD RECORD) मध्ये आपले नाव नोंदवले आहे." विरोधकांच्या टीकेला न जुमानता ही मोठी उपलब्धी साध्य झाली, असे ते म्हणाले. फडणवीस यांनी या कार्यक्रमात उपस्थित असलेल्या गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या अधिकाऱ्यांचेही आभार मानले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढील उद्दिष्टे स्पष्ट केली. ते म्हणाले, पुढील वर्षी १० लाख सौर पंप लावण्याचे लक्ष्य आहे, ज्यामुळे राज्याला १० कोटी रुपये मिळतील. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य बनत आहे, जिथे शेतकऱ्यांना पूर्णतः सौर ऊर्जा आधारित बियाणे आणि सिंचन सुविधा मिळेल, ज्यामुळे प्रदूषणविरहित अन्न उत्पादन शक्य होईल.मुख्यमंत्री म्हणाले की, महायुतीच्या संरचनेमुळे आणि व्यापक सामाजिक दबावामुळे निर्माण झालेल्या राजकीय अस्थिरतेदरम्यानही, हे वर्ष वेगवान विकास, आर्थिक विकास आणि प्रशासकीय गतीवर जोर देणारे ठरले आहे.

प्रशासनाचा मुख्य फोकस मोठ्या शहरी आणि राज्याच्या मूलभूत प्रकल्पांना वेगाने पूर्ण करण्यावर राहिला आहे. यासाठी अधिकाऱ्यांना विशेष निर्देश दिले जात आहेत.'व्यवसाय करणे सोपे' (EASE OF DOING BUSINESS) करण्यासाठी आणि जागतिक गुंतवणूक आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. अनेक क्षेत्रांमध्ये धोरणात्मक आणि प्रशासकीय सुधारणा करण्यात आल्या. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ २५ डिसेंबरपासून सुरू होणार आहे आणि त्यामुळे सरकारने प्रस्तावित तिसऱ्या मुंबईसाठीच्या योजना निश्चित केल्या आहेत. राज्यामध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारला एक वर्ष पूर्ण झाले आहे. यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगर येथे जनतेला संबोधित करताना सांगितले की, जनतेच्या विश्वासाने महाराष्ट्र वेगाने प्रगती करत आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, २०१४ मध्ये जेव्हा ते पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले, तेव्हा शेतकऱ्यांची सर्वात मोठी मागणी पाणी आणि बियाण्यांची उपलब्धता होती. विशेषतः मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या समस्या लक्षात घेऊन १ लाख सौर पंप योजना सुरू करण्यात आली होती. मध्ये काही काळ ही योजना थांबली, परंतु २०२२ मध्ये महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर केंद्र सरकारच्या सहकार्याने कुसुम (KUSUM) योजनेअंतर्गत या योजनेला पुन्हा गती देण्यात आली. महावितरणच्या कामामुळे आज देशभरात जेवढे सौर पंप लावले गेले, त्यापैकी ६५ टक्के सौर पंप एकट्या महाराष्ट्रात लावण्यात आले आहेत. याच कारणामुळे महाराष्ट्र या क्षेत्रात देशात नंबर १ स्थानावर पोहोचला आहे.

# सोलापूरात शिक्षकांचा विराट मोर्चा

## शाळा बंद ठेवून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनिवार्यता, नवीन संच मान्यतेच्या जाचक अटीसह इतर प्रलंबित मागण्यासाठी शिक्षकांनी शाळांना दांडी मारुन शुक्रवारी (दि.5) जिल्हाधिकारी कार्यालयांवर हजारो शिक्षकांनी मोर्चा काढला. या मोर्चात जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शिक्षक संघटनांचा समावेश होता.**

जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनांनी दुपारी दोनच्या सुमारास चार पुतळा येथून मोर्चाला सुरुवात केली. पार्क चौक, सिद्धेश्वर प्रशाला येथून मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज गेट येथे आल्यानंतर मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. यावेळी विविध शिक्षक संघटनेच्या अध्यक्षांनी टीईटी, जाचक संच मान्यता, अशैक्षणिक कामे बंद करावे, अशी मागणी केली. पदोन्नती प्रक्रिया, कंत्राटी कर्मचारी भरती धोरणामुळे राज्याच्या शिक्षण क्षेत्रात अस्वस्थता निर्माण झाली आहे. प्रलंबित प्रश्न मार्गी लावावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांचे नेतृत्व करणाऱ्या महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, शिक्षक संघ थोरात गट, जुनी पेन्शन संघटना, पदवीधर



### बंदमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान

शिक्षणामध्ये कंत्राटीकरण नसावे, अशा विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातील सर्व शाळा बंद ठेऊन पुणे जिल्हातील विविध शिक्षक व शिक्षकेतर संघटनांनी नवीन जिल्हा परिषद – सेंट्रल बिल्डिंग – जिल्हाधिकारी कार्यालय असा एल्गार मोर्चा शुक्रवारी (दि. ५) रोजी काढला.

व केंद्रप्रमुख शिक्षक सभा, शिक्षक भारती, मागासवर्गीय शिक्षक संघटना, शिक्षक संघ, कास्ट्राईब शिक्षक संघटना तर माध्यमिक शिक्षकांच्या टीडीएफ, मुख्याध्यापक महामंडळ, शिक्षक कृती समिती , अखिल भारतीय राष्ट्रीय शिक्षक महासंघ, एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना आदी संघटनेचे पदाधिकारी, शिक्षक आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.यावेळी माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, सुभाष माने, तानाजी माने, सुरेश पवार, अनिरुद्ध पवार, राम शिंदे, नवनाथ गेंड, बापूसाहेब अडसूळ, सचिन झाडबुके, मच्छिंद्र मोरे, कृष्णा हिरेमठ, गिरीश जाधव, सुरेश राठोड, शामराव जवंजाळ, सुधीर कांबळे, श्रीशैल कोरे, मच्छिंद्र भांडेकर आधी शिक्षक उपस्थित होत. टीईटी, जाचक संच मान्यतेसह इतर मागण्यासाठी सर्व शिक्षक संघटना एकत्रित येऊन जिल्ह्यातील काही अपवाद वगळता इतर सर्व शाळा बंद ठेवून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. टीईटी संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर पुनर्विचार करावा, शिक्षक, शिक्षण सेवक योजना रद्द करून नियमित वेतनश्रेणी लागू करावी, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया तात्काळ सुरू करावी.

लोकशाही धोक्यात'? राहुल गांधींच्या समर्थनार्थ चतुर्वेदी यांची प्रतिक्रिया

# प्रियंकाचा केंद्र सरकारवर हल्लाबोल

## 'रशियन भेटी'च्या वक्तव्याला समर्थन

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी (PRIYANKA CHATURVEDI) यांनी केंद्र सरकारवर (CENTRAL GOVERNMENT) लोकशाही कमकुवत करण्याचा गंभीर आरोप केला आहे. तसेच, त्यांनी इंडिगो (INDIGO) एअरलाइनच्या ५५० हून अधिक उड्डाणे रद्द करण्याच्या धोरणावरही टीका करत याविरोधात संसदेत स्थगन प्रस्ताव दिला आहे.**



खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी (RAHUL GANDHI) यांच्या वक्तव्याचे समर्थन केले आहे. राहुल गांधींनी आरोप केला होता की, केंद्र सरकारला असुरक्षित वाटत असल्यामुळे विरोधी पक्षाच्या नेत्याला रशियाच्या राष्ट्रपतींना भेटू दिले जात नाहीये.

चतुर्वेदी यांनी जोर देऊन सांगितले की, २०१४ पासून केंद्र सरकार सातत्याने विरोधकांना कमकुवत करण्याचा प्रयत्न करत आहे आणि असे करून ते लोकशाही कमकुवत करण्याचा प्रयत्न करत आहेत, जे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही. त्या म्हणाल्या, "गेल्या काही दिवसांपासून आपण एका नवीन प्रकारची लोकशाही पाहत आहोत, जिथे केवळ सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांचा आवाज ऐकला जातो, तर विरोधकांचा आवाज दडपला जात आहे." त्या पुढे म्हणाल्या की, हे लोक लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना बाजूला सारण्याचा प्रयत्न करत आहेत.खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी विमान कंपन्यांच्या, विशेषतः इंडिगोच्या मनमानीवर गंभीर चिंता व्यक्त केली. इंडिगोने मुंबई आणि पुणेसह अनेक शहरांमधील ५५० हून अधिक उड्डाणे रद्द केल्याबद्दल त्यांनी सरकारवर ताशेरे ओढले. एअरलाइन्स कंपन्या नियमांचे पालन करत नाहीत. क्रूच्या विश्रांतीच्या (RESTING HOUR) वेळेबाबत दोन वर्षांपूर्वी नवीन नियम आला, पण त्याचे पालन अजूनही झालेले नाही, असा आरोप त्यांनी केला. एअरलाइन्स कंपन्या सामान्यतः स्वतःच्या नफ्याला प्राधान्य देतात, तर सामान्य प्रवाशांच्या हिताला धक्का पोहोचवतात. याबद्दल त्यांनी अनेकदा आवाज उठवला आहे, पण कोणताही सकारात्मक निर्णय झाला नाही. त्यांनी या विषयावर सभागृहात स्थगन प्रस्ताव दिला

### मनमानीवर गंभीर चिंता व्यक्त

हे लोक लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना बाजूला सारण्याचा प्रयत्न करत आहेत.खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी विमान कंपन्यांच्या, विशेषतः इंडिगोच्या मनमानीवर गंभीर चिंता व्यक्त केली. इंडिगोने मुंबई आणि पुणेसह अनेक शहरांमधील ५५० हून अधिक उड्डाणे रद्द केल्याबद्दल त्यांनी सरकारवर ताशेरे ओढले. एअरलाइन्स कंपन्या नियमांचे पालन करत नाहीत.

आहे आणि सभापतींनी नागरी उड्डाण मंत्रांकडून यावर तातडीने माहिती घ्यावी, अशी मागणी केली. आंतरराष्ट्रीय विमाने सुरळीत सुरू आहेत, पण देशांतर्गत प्रवाशांना त्रास होत आहे, हे दुर्दैवी आहे, असे त्या म्हणाल्या.शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी (PRIYANKA CHATURVEDI) यांनी केंद्र सरकारवर (CENTRAL GOVERNMENT) लोकशाही कमकुवत करण्याचा गंभीर आरोप केला आहे. तसेच, त्यांनी इंडिगो (INDIGO) एअरलाइनच्या ५५० हून अधिक उड्डाणे रद्द करण्याच्या धोरणावरही टीका करत याविरोधात संसदेत स्थगन प्रस्ताव दिला आहे. खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी (RAHUL GANDHI) यांच्या वक्तव्याचे समर्थन केले आहे. राहुल गांधींनी आरोप केला होता की, केंद्र सरकारला असुरक्षित वाटत असल्यामुळे विरोधी पक्षाच्या नेत्याला रशियाच्या राष्ट्रपतींना भेटू दिले जात नाहीये.

चतुर्वेदी यांनी जोर देऊन सांगितले की, २०१४ पासून केंद्र सरकार सातत्याने विरोधकांना कमकुवत करण्याचा प्रयत्न करत आहे आणि असे करून ते लोकशाही कमकुवत करण्याचा प्रयत्न करत आहेत, जे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही. त्या म्हणाल्या, "गेल्या काही दिवसांपासून आपण एका नवीन प्रकारची लोकशाही पाहत आहोत, जिथे केवळ सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांचा आवाज ऐकला जातो, तर विरोधकांचा आवाज दडपला जात आहे.

# सीमा हैदर पुन्हा गर्भवती, सहाव्यांदा होणार आई

## पाकिस्तानातून पळून चार मुलांसह भारतात आलेली सीमा हैदर

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पाकिस्तानातून आपल्या चार मुलांसह भारतात स्थलांतरित झालेल्या सीमा हैदरने आणखी एक आनंदाची बातमी शेअर केली आहे. गुरुवारी तिच्या यूट्यूब चॅनलवर अपलोड केलेल्या व्हिडिओमध्ये सीमाने ती पुन्हा गर्भवती असल्याचे संकेत दिले. व्हिडिओच्या थंबनेलने देखील याची स्पष्टपणे पुष्टी केली.**

व्हिडिओमध्ये सीमाने विनोदाने टिप्पणी केली की तिचा पती सचिन तिला जड काम करू देत नाही, ज्यामुळे हे स्पष्ट होते की लवकरच कुटुंबात एक नवीन सदस्याचा सहभाग होणार आहे."पाकिस्तानी भाभी" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सीमा हैदरने तिच्या यूट्यूब चॅनेलवर ही माहिती शेअर केली. सीमा आणि सचिनने गुरुवारी त्यांच्या यूट्यूब चॅनेलवर अपलोड केलेल्या व्हिडिओच्या थंबनेल इमेजमध्ये याची पुष्टी केली. सीमा हैदर आधीच पाच मुलांची आई आहे. तिचा पाकिस्तानी पती गुलाम हैदरपासून तिला चार मुले आहेत, तर सचिनलाही एक मुलगी आहे. या वर्षी १८ मार्च रोजी सीमा हैदरने एका मुलीला जन्म दिला, तिचे नाव तिने भारती ठेवले. आता स्वतःला कृष्णभक्त म्हणवणारी



सीमा हैदर तिच्या मुलीला प्रेमाने मीरा देखील म्हणते.सीमा हैदरने अलीकडेच एका व्हिडिओमध्ये पुन्हा एकदा तिच्या गरोदरपणाचे संकेत दिले. तिच्या आईच्या पोटाकडे बोट दाखवत तिची मोठी मुलगी म्हणाली, "आता सहा भावंडे आहेत." सीमा हसली आणि तिला गप्प बसली. आता, सीमाने व्हिडिओच्या थंबनेलवर "गर्भधारणा" असे लिहून याची पुष्टी केली आहे.PUBG खेळत असताना, सीमा हैदर ग्रेटर नोएडातील रबुपुरा गावातील

### यूट्यूब चॅनलवर व्हिडिओ अपलोड

व्हिडिओच्या थंबनेलने देखील याची स्पष्टपणे पुष्टी केली. व्हिडिओमध्ये सीमाने विनोदाने टिप्पणी केली की तिचा पती सचिन तिला जड काम करू देत नाही, ज्यामुळे हे स्पष्ट होते की लवकरच कुटुंबात एक नवीन सदस्याचा सहभाग होणार आहे."पाकिस्तानी भाभी" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सीमा हैदरने तिच्या यूट्यूब चॅनेलवर ही माहिती शेअर केली.

सचिन मीनाला भेटली. त्यानंतर, सीमा तिच्या चार मुलांसह पाकिस्तानातून पळून गेली आणि भारतात आली. ती मे २०२३ पासून सचिनच्या घरी राहत आहे. ती आता स्वतःला सचिनची पत्नी म्हणते. दोघेही विवाहित असल्याचा दावा करतात.सीमा नेहमीच तिच्या चाहत्यांसह तिच्या आयुष्यातील वास्तव शेअर करते आणि आता तिने YOUTUBE द्वारे या नवीन आयुष्याची आनंदाची बातमी शेअर केली आहे. पाकिस्तानातून आपल्या चार मुलांसह भारतात स्थलांतरित झालेल्या सीमा हैदरने गुरुवारी तिच्या यूट्यूब चॅनेलवर अपलोड केलेल्या व्हिडिओमध्ये सीमाने ती पुन्हा गर्भवती असल्याचे संकेत दिले.

# 'अखंडा 2'चित्रपटाच्या रिलीजमध्ये अडथळा

नंदमुरी बालकृष्ण यांचा 'अखंड २' हा चित्रपट ५ डिसेंबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार होता, परंतु आता तो पुढे ढकलण्यात आला आहे, ज्यामुळे प्रेक्षकांना धक्का बसला आहे. चाहते या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत होते. 'अखंड २' मध्ये 'बजरंगी भाईजान' ची मुन्नी हर्षाली मल्होत्रा देखील आहे, ज्यामुळे चित्रपटाची क्रेझ आणखी वाढली होती. पण आता हा चित्रपट पुढे ढकलण्यात आला आहे आणि निर्मात्यांनी एका पोस्टमध्ये याचे कारण देखील सांगितले आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या एक दिवस आधी त्यांनी याची माहिती दिली आणि तेव्हापासून चाहतेही दुखी झाले आहेत.गुरुवारी, ४ डिसेंबर रोजी संध्याकाळी, "अखंड २," १४ रील्स प्लसच्या मागे असलेल्या प्रॉडक्शन हाऊसने तांत्रिक समस्यांमुळे चित्रपटाचा प्रीमियर रद्द करण्यात आल्याची घोषणा केली. प्रॉडक्शन हाऊसने X वर पोस्ट केले की, "आज होणारा 'अखंड २' चा प्रीमियर तांत्रिक समस्यांमुळे रद्द करण्यात आला आहे. आम्ही आमचे सर्वोत्तम प्रयत्न केले, परंतु काही घटक आमच्या नियंत्रणाबाहेर आहेत. गैरसोयीबद्दल क्षमस्व."नंतर, प्रॉडक्शन हाऊसने 'अखंड २' प्रदर्शित होण्याच्या एक रात्री आधी चित्रपट पुढे ढकलण्याची घोषणा केली. निर्मात्यांनी X वर लिहिले, "जड अंतःकरणाने, आम्हाला तुम्हाला कळवण्यास खेद होत आहे की 'अखंड २' अपरिहार्य परिस्थितीमुळे वेळापत्रकानुसार प्रदर्शित होऊ शकणार नाही. हा आमच्यासाठी एक दुःखद क्षण आहे. चित्रपटाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या प्रत्येक चाहत्यावर याचा किती खोलवर परिणाम होईल

# आर्यन खान विरोधात पोलिसांत तक्रार दाखल

शाहरुख खानचा मुलगा आणि "बॅड्स ऑफ बॉलीवूड" चा दिग्दर्शक आर्यन खान पुन्हा एकदा अडचणीत सापडला आहे. बेंगळुरूमधील एका पबमध्ये एका कथित कौरला मिडिल फिंगर दाखवतानाचा त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात खळबळ उडाली आहे. एका वकिलाने त्याच्याविरुद्ध असभ्य वर्तनाचा आरोप करत तक्रार दाखल केली आहे.खरंतर, २८ नोव्हेंबर रोजी आर्यन खान एका कार्यक्रमासाठी बेंगळुरूला गेला होता. यादरम्यान, तो अशोकनगर पोलिस स्टेशनजवळील एका पबमध्ये दिसला. तिथून त्याचा एक व्हिडिओ व्हायरल झाला, ज्यामध्ये तो मिडिल फिंगर दाखवताना दिसत होता आणि सर्वांचे लक्ष त्याच्यावर केंद्रित झाले होते. व्हायरल व्हिडिओमध्ये बॉलीवूड सुपरस्टार शाहरुख खानचा मुलगा कन्नड अभिनेता झैद खान, गृहनिर्माण आणि वक्फ मंत्री जमीर अहमद खान यांचा मुलगा आणि काँग्रेस नेते मोहम्मद नालापद, काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार एनए हरिस यांचा मुलगा यांच्यासोबत बेंगळुरूमधील एका पबमध्ये प्रवेश करताना दिसत आहे. सुरुवातीला, तो आनंदाने गर्दीला हात हलवत असल्याचे दिसून आले. नंतर, तो मिडिल फिंगर दाखवू लागला आणि हसत राहिला. आयएएनएसनुसार, बेंगळुरू पोलिसांनी पबला भेट दिली आणि आर्यन खानने मिडिल फिंगर दाखवल्याच्या कथित व्हिडिओबद्दल त्याच्या व्यवस्थापकाची चौकशी केली.

# प्रीती झिंटाने घेतला मोठा निर्णय



अभिनेत्री प्रीती झिंटा सध्या आयपीएलमुळे मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. काल मंगळवारी (३ जून) आयपीएल २०२५ ची सांगता झाली. या पर्वाच्या अंतिम सामन्यामध्ये प्रीती झिंटाचा संघ पंजाब किंग्ज व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू प्रतिस्पर्धी होते. परंतु, आरसीबीनं पंजाब किंग्जवर सहा धावांनी मात केली. त्यामुळे प्रीती झिंटाचा संघ कमी धावांच्या फरकामुळे आयपीएलच्या ट्रॉफीला मुकला. या संपूर्ण मोसमात प्रीती झिंटा अनेकदा चर्चेचा विषय ठरली. प्रीती झिंटा फक्त अभिनयापुरती मर्यादित न राहता, ती पंजाब किंग्ज या संघाची मालकीण आहे. एवढंच नव्हे, तर याव्यतिरिक्तसुद्धा ती आणखी एक महत्त्वाची जबाबदारी पार पाडत आहे. प्रीती झिंटानं सांगितलं होतं की, तिनं ३४ मुलींना दत्तक घेतले आहे. 'पिंकव्हिला'च्या वृत्तानुसार ती या मुलींच्या शिक्षण, जेवण व कपडे यांचा सर्व खर्च करणार असल्याचं अभिनेत्रीनं सांगितलं होतं. पुढे अभिनेत्री म्हणाली, "त्या आता माझ्या मुली आहेत. माझी जबाबदारी आहेत. मी सातत्यानं त्यांच्या संपर्कात असेन आणि वर्षातून दोनदा त्यांची भेट घेईनप्रीती झिंटाच्या खासगी आयुष्याबद्दल बोलायचं झालं, तर तिनं जीन गुडइनफसह २०१६ साली लॉस एंजेलिसमध्ये लग्न केलं होतं. तिचे पती जीन गुडइनफ आर्थिक विश्लेषक आहेत. प्रीती झिंटा व जीन गुडइनफ या दोघांना दोन मुलं आहेत. एक मुलगी आणि एक मुलगा. २०२१ साली सरोगसीमार्फत दोन मुलांना जन्म दिला.

# सोनाक्षी–झहीरच्या नात्यात तणाव

बॉलीवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा आणि अभिनेता झहीर इक्बाल यांच्या रिलेशनशीपला आता आठ वर्षे झाली आहेत. त्यांच्या लग्नालाही एक वर्ष झाले आहे. पहिल्यांदाच, सोनाक्षी सिन्हाने उघडपणे मान्य केले आहे की झहीर इक्बालसोबतचे तिचे नाते नेहमीच सोशल मीडियावर दिसते तितके सोपे नव्हते. वाटेत त्यांनी अनेक चढ-उतारांचा सामना केला आहे, परंतु त्यांनी आव्हानांचा सामना केला आहे.सोहा अली खानच्या पॉडकास्टवरील मुलाखतीदरम्याने, सोनाक्षी सिन्हाने खुलासा केला की झहीर इक्बालसोबतच्या तिच्या नात्यातील पहिल्या तीन वर्षांनंतर, त्यांच्यातील तणाव इतका वाढला होता की त्यांना कपल्स थेरपी घ्यावी लागली. सोनाक्षी म्हणाली, "आमच्यात एक असा टप्पा होता जेव्हा आम्हाला एकमेकांचे केस उपटायचे होते. आम्ही काहीही केले तरी आम्ही एकमेकांचा दृष्टिकोन समजू शकलो नाही."दोघांनाही मनापासून खात्री होती की त्यांना नाते वाचवायचे आहे. तिने सांगितले की झहीरने थेरपी सुचवली आणि तिने ती मान्य केली.



# बोल्ड सीन करण्याबद्दल श्रियाची प्रतिक्रिया

मराठीसह हिंदी सिनेसृष्टीतही लोकप्रिय असलेली जोडी म्हणजे सचिन पिळगावकर आणि सुप्रिया पिळगावकर. या जोडीने आजवर अनेक हिट चित्रपट देत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. आई-वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांची लाडकी लेक श्रिया पिळगांवकरदेखील अभिनय क्षेत्रात आली. 'मिर्झापूर', 'गिल्टी माईंड्स', 'द ब्रोकन न्यूज', 'ड्राय डे', 'ताजा खबर'सारख्या सीरिजमधून श्रियाने ओटीटी विश्व गाजवलं आहे. अशातच आता लवकरच ती 'छलकपट' सीरिजमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ओटीटीमध्ये श्रियाने अनेकविध भूमिका साकारल्या आहेत. 'छलकपट' सीरिजनिमित्ताने श्रियाने नुकताच लोकमत फिल्मीशी संवाद साधला. यावेळी तिला सीरिजमधील बोल्ड सीन करताना कोणता विचार करावा लागतो का? याबद्दल आई-वडिलांशी चर्चा होते का? असं विचारण्यात आलं.याचं उत्तर देताना श्रिया म्हणाली, "मला वाटतं ऑफस्क्रीन संस्कार हे ऑनस्क्रीन संस्कारांपेक्षा जास्त महत्त्वाचे आहेत. मला माझ्या ऑफस्क्रीन संस्कारांवर विश्वास आहे. पण एक कलाकार म्हणून मी स्वतःवर मर्यादा घालू शकते असं मला वाटतं नाही किंवा तसं करूही नये. आता काळानुसार एखादी गोष्ट सांगण्याची पद्धत खूप बदलली आहे. आताच्या कामातली मर्यादा आणि सहजता पुर्वीपेक्षा बदलली आहे."यापुढे श्रिया म्हणते, "एखाद्या प्रेमकथेमध्ये मुलगा-मुलगी हे किस करताना दाखवलं जातं. तसे सीन करण्यासाठी मी नाही म्हणणार नाही. पण ते पडद्यावर कसं दाखवलं जाणार आहे? त्या सीनला कसं साकारलं जाणार आहे? त्यामागे नक्की काय भावना आहे? हे महत्त्वाचं आहे. मला स्वतःला कळतं की, त्यामागचा नेमका अर्थ काय आहे."यापुढे श्रिया म्हणाली, "एखाद्या सीरिजमधील बोल्ड सीनमुळे त्याचं थेट मूल्यमापन करू नये. कारण ती त्या-त्या कथेची गरजही होती. त्यामुळे मला वाटतं की, अशा सीनमागची तुमचा हेतु महत्त्वाचा आहे. यासाठी आई-वडील मला नेहमीच पाठींबा देतात. पण त्यांना माहीत आहे की, मलाही ते निर्णय घेण्याचं स्वतंत्र आहे. पण इंटरनेटवर काहीही होऊ शकतं. फेक व्हिडीओ वगैरे... काहीही होऊ शकतं."मराठीसह हिंदी सिनेसृष्टीतही लोकप्रिय असलेली जोडी म्हणजे सचिन पिळगावकर आणि सुप्रिया पिळगावकर. या जोडीने आजवर अनेक हिट चित्रपट देत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. आई-वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांची लाडकी लेक श्रिया पिळगांवकरदेखील अभिनय क्षेत्रात आली. 'मिर्झापूर', 'गिल्टी माईंड्स', 'द ब्रोकन न्यूज', 'ड्राय डे', 'ताजा खबर'सारख्या सीरिजमधून श्रियाने ओटीटी विश्व गाजवलं आहे.

**बीसीसीआयच्या अडचणी वाढल्या**

## मुश्ताक अली ट्रॉफी सामन्यांच्या वेळापत्रकात बदल

# विमान उड्डाणे रद्दचा BCCI ला फटका!

## नॉकआउट समन्यांचे ठिकाण बदलले



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंडिगो फ्लाइट रद्द करण्यात आल्यामुळे त्याचा फटका संपूर्ण देशासह बीसीसीआयला देखील बसला आहे. विविध ठिकाणचे लोक विमानतळांवर अडकून आहेत. इंडिगोच्या फ्लाइट रद्दमुळे बीसीसीआयला सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीच्या नॉकआउट फेरीचे सामने स्थलांतरित करावे लागले आहेत. इंदूर येथे होणारे नॉकआउट सामने आता पुण्यात खेळवण्यात येणार आहेत. हे सामने मूळतः होळकर क्रिकेट स्टेडियम आणि एमराल्ड हायस्कूल मैदानावर खेळले जाणार आहेत. शेवटचे १२ सामने, सुपर लीग आणि अंतिम सामना १२ ते १८ डिसेंबर दरम्यान येथे पार पडणार होते. परंतु, आता हे सर्व सामने पुण्यात हलवण्यात आले आहेत.**

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीचे नॉकआउट सामने आता पुण्यातील एमसीए स्टेडियम आणि डीवाय पाटील अकादमी येथे होणार आहेत. मध्य प्रदेश क्रिकेट असोसिएशनचे सीईओ रोहित पंडित यांनी या बातमीला दुजोरा दिला आहे. टाईम्स ऑफ इंडियाने रोहित पंडित यांच्या हवाल्याने वृत्त दिले आहे की, त्यांनी बीसीसीआयला १५ दिवस आधीच कळवले होते की ते सय्यद मुश्ताक अली नॉकआउट सामने आयोजित करणे जमणार नाही. इंडिगो फ्लाइट संकटाव्यतिरिक्त, इंदूर ९ ते १२ डिसेंबर दरम्यान जागतिक डॉक्टरांची परिषद देखील आयोजित करण्यात येणार आहे. ज्यामुळे तिथिल हॉटेल खोल्यांचा तुटवडा जाणवू लागला आहे. बीसीसीआयकडून सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेच्या ठिकाणांमध्ये बदल करण्यात आलो आहे. परंतु जगातील सर्वात श्रीमंत बोर्डाला आता गंभीर लॉजिस्टिक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.

बीसीसीआयला अहमदाबाद, कोलकाता, लखनौ आणि हैदराबाद या चार एसएमएटी गट टप्प्यातील ठिकाणांमधून खेळाडू, प्रशिक्षक, पंच आणि अधिकारी पुण्यात आणावे लागणार आहेत. याव्यतिरिक्त, इतर देशांतर्गत स्पर्धा देखील खेळल्या जात आहेत. वृत्तानुसार, जर इंडिगोचे संकट असेच सुरू राहिले तर आठ संघांना, पंच आणि इतर अधिकाऱ्यांना, नॉकआउट सामन्यांसाठी पुण्यात आणणे कठीण ठरण्याची शक्यता आहे. याव्यतिरिक्त, महिला अंडर-२३ टी-२० ट्रॉफी आणि पुरुष अंडर-१९ कूचबिहार ट्रॉफी देखील अहमदाबादमध्ये खेळवली जात आहे. ज्यामुळे संघ आणि अधिकाऱ्यांना वारंवार प्रवास करावा लागत आहे.इंडिगो फ्लाइट रद्द करण्यात आल्यामुळे त्याचा फटका संपूर्ण देशासह बीसीसीआयला देखील बसला आहे. विविध ठिकाणचे लोक विमानतळांवर अडकून आहेत. इंडिगोच्या फ्लाइट रद्दमुळे बीसीसीआयला सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीच्या नॉकआउट फेरीचे सामने स्थलांतरित करावे लागले आहेत.

इंदूर येथे होणारे नॉकआउट सामने आता पुण्यात खेळवण्यात येणार आहेत. हे सामने मूळतः होळकर क्रिकेट स्टेडियम आणि एमराल्ड हायस्कूल मैदानावर खेळले जाणार आहेत. शेवटचे १२ सामने, सुपर लीग आणि अंतिम सामना १२ ते १८ डिसेंबर दरम्यान येथे पार पडणार होते. परंतु, आता हे सर्व सामने पुण्यात हलवण्यात आले आहेत. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीचे नॉकआउट सामने आता पुण्यातील एमसीए स्टेडियम आणि डीवाय पाटील अकादमी येथे होणार आहेत. मध्य प्रदेश क्रिकेट असोसिएशनचे सीईओ रोहित पंडित यांनी या बातमीला दुजोरा दिला आहे. टाईम्स ऑफ इंडियाने रोहित पंडित यांच्या हवाल्याने वृत्त दिले आहे की, त्यांनी बीसीसीआयला १५ दिवस आधीच कळवले होते की ते सय्यद मुश्ताक अली नॉकआउट सामने आयोजित करणे जमणार नाही. इंडिगो फ्लाइट संकटाव्यतिरिक्त, इंदूर ९ ते १२ डिसेंबर दरम्यान जागतिक डॉक्टरांची परिषद देखील आयोजित करण्यात येणार आहे. ज्यामुळे तिथिल हॉटेल खोल्यांचा तुटवडा जाणवू लागला आहे.

### हॉटेल खोल्यांचा तुटवडा

हैदराबाद या चार एसएमएटी गट टप्प्यातील ठिकाणांमधून खेळाडू, प्रशिक्षक, पंच आणि अधिकारी पुण्यात आणावे लागणार आहेत. याव्यतिरिक्त, इतर देशांतर्गत स्पर्धा देखील खेळल्या जात आहेत. वृत्तानुसार, जर इंडिगोचे संकट असेच सुरू राहिले तर आठ संघांना, पंच आणि इतर अधिकाऱ्यांना, नॉकआउट सामन्यांसाठी पुण्यात आणणे कठीण ठरण्याची शक्यता आहे. याव्यतिरिक्त, महिला अंडर-२३ टी-२० ट्रॉफी आणि पुरुष अंडर-१९ कूचबिहार ट्रॉफी देखील अहमदाबादमध्ये खेळवली जात आहे.

# हा तर रोनाल्डोच खेळताना दिसतोय!

## एका बिहारी मुलाचा फुटबॉल मैदानावर जादुई खेळ; व्हिडिओ व्हायरल



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**क्रिकेट हा भारत देशातील सर्वात लोकप्रिय खेळ असून भारतात या खेळाचे मोठ्या प्रमाणात चाहते आहेत. लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत, सर्वजण दिवसभर रस्त्यावर बॅट आणि बॉलने खेळताना दिसून येतात. म्हणूनच देशात क्रिकेटसाठी अनेक प्रतिभावान खेळाडू पुढे आले आहेत. भारतीय क्रिकेट संघाचा जगात दबदबा आहे.**

या तुलनेत मात्र टेनिस, फुटबॉल, हॉकी आणि पोहण्यासाठी खेळाडू शोधण्यासाठी खूप संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र आहे. मात्र अशातच, एक बिहारी मुलगा फुटबॉल मैदानावर आपला खेळ खेळताना दिसून आला. विशेष म्हणजे त्या मुलाची तुलना थेट दिग्गज फुटबॉलपटू रोनाल्डोसोबत होऊ लागली आहे. त्याचा एक व्हिडिओ देखील व्हायरल झाला आहे.रेडिटवर शेअर करण्यात आलेल्या व्हिडिओमध्ये स्थानिक मैदानावर फुटबॉल सामना खेळला जात असल्याचे दिसत आहे. जिथे खेळाडू उच्च दर्जाचे खेळ खेळताना दिसत आहेत. त्याची आक्रमक शैली तुम्हाला अर्जेंटिना आणि ब्राझील सारख्या देशांमधील सामन्यांची आठवण करून देणारी आहे. बहुतेक खेळाडू मैदानात उच्च दर्जाचे फुटबॉल खेळताना दिसत होते. दरम्यान, एका खेळाडूने हवेत उडी मारून पास गोलमध्ये मारला, अगदी ही सारे चित्र दिग्गज खेळाडू रोनाल्डोसारखे असेच होते. या खेळाडूला आता बिहारी रोनाल्डो म्हणून संबोधण्यात येत आहे.भारत देशात फुटबॉलमध्ये प्रतिभेचा खजिना असेलला दिसत आहे. आता, हे खेळाडू सोशल मीडियाद्वारे समोर येऊ लागले आहेत. असे असून देखील प्रतिभावान खेळाडू लहान शहरे आणि खेड्यांमध्ये अस्तित्वात आहेत.

### बिहारी रोनाल्डो आहे तरी कोण?

त्यांना मोठ्या व्यासपीठावर प्रवेश देण्यात येत नसेल तर त्यांची आवड आणि कठोर परिश्रम निर्विवाद आहेत.ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात २०२५-२६ च्या ॲशेस मालिकेमधील दुसरा कसोटी सामना ब्रिस्बेनमध्ये खेळला जात आहे. हा सामना डे-नाईट टेस्ट म्हणून खेळला जात असून ऑस्ट्रेलियाच्या मार्नस लाबुशेनने डे-नाईट टेस्ट क्रिकेटमध्ये एक मोठा टप्प्याला गवसणी घातली आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार ।
। दि. ६ डिसेंबर २०२५।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

**PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE**
MOSHI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
43 Years of Excellence in Education

# 43 YEARS OF **NURTURING VALUES, EXCELLENCE AND TOMORROW'S LEADERS.**

## ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade XII



**43**
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION

**17K+**
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES

**12+**
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA

**65+**
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS

**650+**
TEACHING AND NON TEACHING STAFF

**14K+**
14,000 ALUMNI ACROSS GLOBE

**ENROLL NOW**

**OFFICE HOURS:**
MONDAY TO SATURDAY, 8 AM – 5 PM

**WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?**

43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation

**+91 9890613333 | +91 9373073077**

pgosm05@gmail.com www.priyadarshanischoolmoshi.in

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

। शनिवार ।

। दि. ६ डिसेंबर २०२५।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## हिवाळी अधिवेशनामध्ये आमदार लांडगेंची तोफ धडाडणार!

# मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त ते वाहतूक 'कनेक्टिव्हीटी'वर लक्षवेधी!

### पिंपरी-चिंचवडमधील विविध 15 प्रश्नांबाबत राज्य सरकारचे लक्ष वेधण्याची तयारी

। पिंपरी-चिंचवड। महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड शहरातील प्रलंबित प्रश्न आणि विकासकामांना गती देण्यासाठी भाजपा महायुती सरकारने प्राधान्य दिले. त्यामुळे सरसकट शास्तीकर माफीपासून आंद्रा- भामा आसखेड सारखी जलसंजीवनी देणारी योजनापर्यंत पिंपरी-चिंचवडकरांच्या हक्कांना न्याय मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आता शहर "शाश्वत विकासाचाच्या दिशेने" वाटचाल करीत आहे. नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने पुन्हा एकदा पिंपरी-चिंचवडकरांची भूमिका सभागृहात मांडणार आहे. त्यासाठी विविध 15 मुद्यांवर आम्ही तयारी केली आहे, अशी माहिती आमदार महेश लांडगे यांनी दिली.**




महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन 8 डिसेंबर 2025 पासून नागपूरात सुरू होत असून, भाजपा आमदार महेश लांडगे यांनी अधिवेशनासाठी तयारी केली आहे. विकासकामांना गती, वाहतूक समस्यांवरील दीर्घकालीन उपाय, सार्वजनिक सुरक्षेशी निगडित प्रश्न, पायाभूत सुविधा, शिक्षण, जलपुरवठा, औद्योगिक वाढ इत्यादी विषयांवर ते एकूण 15 महत्त्वपूर्ण मुद्दे सरकारसमोर मांडणार आहेत.

आमदार लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण राज्यात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून नागरिकांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने शाळा, रुग्णालये, रेल्वे स्टेशन यांसारख्या सार्वजनिक ठिकाणांहून मोकाट कुत्रे हटवण्याचे निर्देश दिले आहेत. त्याचवेळी, प्राणी जन्म नियंत्रण (ABC) नियमांनुसार निर्जंतुकीकरण, लसीकरण आणि त्यांना त्याच जागी सोडणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले आहे. या अंमलबजावणीची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर टाकण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर लांडगे यांनी राज्य सरकारने एकसंध आणि कडक धोरण जाहीर करून, मोकाट कुत्र्यांच्या समस्येवर प्रभावी बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे.

विशेष म्हणजे, जुन्नर व पुणे ग्रामीण भागात बिबट्यांचे हल्ले वाढत असून, अन्नाच्या अभावामुळे बिबटे मानवी वसाहतीत येत आहेत. त्यामुळे ज्या मोकाट कुत्र्यांचा उपद्रव आहे, त्यांना पकडून बिबटप्रवण क्षेत्रात सोडण्याची व्यवस्था केल्यास बिबट्यांचे शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होईल आणि मोकाट कुत्र्यांची समस्या कमी होण्यासही मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

आगामी हिवाळी अधिवेशनात पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीएच्या दीर्घकालीन विकासाला प्राधान्य देत, सर्व मुद्द्यांवर सखोल चर्चा व ठोस निर्णय मिळवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे आमदार लांडगे यांनी सांगितले.

## अधिवेशनात हे मुद्दे मांडणार...



शिवचरित्र, जलपुरवठा, शिक्षण, उद्योग, प्राधिकरण विषयांसह इतर प्रमुख मागण्या हिवाळी अधिवेशनात लांडगे यांचा भर खालील मुद्द्यांवरही राहणार आहे. CBSE अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांचा सविस्तर इतिहास समाविष्ट करणे. एमसीव्हीसी शिक्षक भरती तातडीने मंजूर करणे. PCNTDA च्या 8,379 भूखंडांना फ्री-होल्ड लाभ मिळवून देणे. पिंपरी-चिंचवडसाठी मुळशी आणि चासकमान धरणातून पाणी आरक्षण निश्चित करणे. मोशी येथे मेडीसिटी प्रकल्प उभारणे. PMRDA च्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राला छत्रपती संभाजी महाराज हे नामकरण करणे. आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांसाठी गृहयोजना प्रकल्पातील सदनिकाधारकांना दंडमाफी, कुदळवाडी–चिखली अतिक्रमणानंतर IT/INDUSTRIAL HUB साठी धोरण ठरवणे. PMRDA मध्ये EDUCATION HUB (IIT–AIIMS–IIM झोन) साठी धोरणात्मक निर्णय घेणे. पवना, मुळा आणि इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला चालना देणे. रेड झोन व ब्ल्यू लाईन रेडिरेकनर नियमावलीत सुधारणा यासह इव्हेंट–डेकोरेशन व्यवसायिकांसाठी वाहतूक नियम शिथिलता असे मुद्यांवर अधिवेशनात पाठपुरावा करण्यात येणार आहे.

## वाहतूक सक्षमीकरण...

पिंपरी-चिंचवड व पुणे महानगराच्या सभोवतालच्या भागात नागरिकरण आणि औद्योगिकरण प्रचंड वेगाने वाढत आहे. हिंजवडी आयटी हब तसेच चाकण–तळेगाव औद्योगिक पट्ट्यात दररोजची वाहतूक कोंडी भीषण स्वरुपात वाढली आहे. आमदार लांडगे यांनी सांगितले की, "सरकार प्रयत्नशील असले तरी अद्याप प्रकल्पांना अपेक्षित गती मिळालेली नाही. यामुळे IT क्षेत्र आणि उद्योग क्षेत्रात नाराजी वाढत आहे." त्यामुळे त्यांनी सरकारकडे खालील मागण्या केल्या आहेत. वाहतूक समस्यांवरील सर्व प्रकल्प 'फास्टट्रॅक'वर आणावेत. पुणे रिंगरोड प्रकल्पातील भूसंपादन अडथळे तातडीने दूर करावेत. राष्ट्रीय महामार्गांच्या रुंदीकरण प्रक्रियेची गती वाढवावी. पिंपरी-चिंचवडमध्ये पुणे–नाशिक महामार्गाचे रुंदीकरण व मिसिंग लिंकचे काम गतीमान करण्यासाठी महापालिका पातळीवर विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. संपूर्ण वाहतूक समस्यांसाठी सरकारने कृतीशील, वेळबद्ध प्रकल्प आराखडा जाहीर करावा, याकडे लक्ष वेधण्यात येणार आहे.

### शिक्षण विश्व: ‘राजमाता जिजाऊ’ महाविद्यालयाचे

# खेळाडू राष्ट्रीय पातळीवर चमकणार!

## महाराष्ट्राच्या 19 वर्षाखालील क्रिकेट संघात 3 खेळाडुंचा समावेश



| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे : नाशिक येथे आयोजित शालेय राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेतून महाराष्ट्र राज्याचा 19 वर्षाखालील मुलांचा संघ निवडण्यात आला असून, त्यामध्ये पुणे येथील राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लांडेवाडी भोसरी येथील कनिष्ठ महाविद्यालयाचे तीन विद्यार्थी राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडले गेले आहेत.**

कनिष्ठ महाविद्यालयातील कु. महेक नबीलाल मुल्ला (11वी वाणिज्य), कु. आदित्य नितीन कापरे (12वी वाणिज्य) आणि कु. संतोष नरेंद्र चव्हाण (11वी वाणिज्य) यांची डिसेंबर महिन्यात हरियाणातील रोहतक येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही निवड महाराष्ट्रातील मुंबई, कोल्हापूर, संभाजीनगर, अमरावती, लातूर, नाशिक, नागपूर आणि पुणे या आठ विभागातून आलेल्या संघांमधून करण्यात आली.\

हेही वाचा – प्रतिभा सृजन व्याख्यानमाला 2025 : चिंचवड येथे “चला उभारू नवी पिढी” चा संकल्प

सदर खेळाडूंना महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. गोपीचंद करंडे आणि प्रशिक्षक दत्तात्रय वाळके यांनी विशेष मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष आणि भोसरीचे प्रथम आमदार विलास लांडे यांनी या यशाबद्दल विशेष अभिनंदन केले आणि खेळाडूंना राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे खजिनदार अजित भाऊ, सचिव सुधीर मुंगसे, नगरसेवक व विश्वस्त विक्रम लांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कानडे के.जी., उपप्राचार्य प्रा. किरण चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. नेहा बोरसे, रजिस्ट्रार अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा. योगिता बारवकर, प्रा. संगिता गवस, प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

> “महाराष्ट्राचं नाव राष्ट्रीय स्तरावर उज्वल करणाऱ्यासाठी सज्ज झालेले ‘राजमाता जिजाऊ’चे क्रिकेटपटू महेक, आदित्य आणि संतोष यांना मी मनःपूर्वक शुभेच्छा देतो. तुमचा हा संघर्ष आणि मेहनत इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल. राष्ट्रीय स्पर्धेत तुमच्या यशाची आम्ही अपेक्षा करतो.
> **–विलास लांडे,** अध्यक्ष, राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ.




www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION
OPEN
FOR THE YEAR
2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers
for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046